**प्रेस नोट दिनांक २५/०५/२०१९**

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे

## विश्रांतवाडीत होणारा बालविवाह विश्रांतवाडी पोलीसांनी रोखला.

विश्रांतवाडी येथील एकतानगर परिसरात राहणा-या चोवीस वर्षीय मुलाचा विवाह सतरा वर्षे वयाचे मुलीशी,विद्यानगरमधील मंगल कार्यालयात दिनांक २३/५/२०१९ रोजी विविह सोहळा पार पडणार असल्याची गोपणीय माहीती नागरिकांचे मार्फतीने पोलीसांना समजली. दिनांक २२/५/२०१९ रोजी नवरदेव व मुलींचे पालकांना पोलीस ठाण्यात बोलावुन त्यांचेकडे मुलीचे वया बाबत खात्री केली असता मुलीच्या वयाचे कोणतेही प्रमाणपत्र त्यांच्याकडे नव्हते. मुलीच्या जन्मतारखेवरुन मुलीचे वय १७ असल्याची खात्री झाल्याने दोन्हीही पालकांचे समुपदेशन केले.व त्यांना बालविवाह करणे कायद्याने गुन्हा असल्याचे महत्व पटवुन देवुन असा विवाह केल्यास कायदेशीर कारवाई करण्याची लेखी नोटीस देण्यात आली होती. त्यावेळी पालकांनी मुलीचे वय कमी असल्याने उद्या विवाह करणार नसल्याची ग्वाही दिली.तरी देखील असा कोणताही प्रकार घडु नये याची खबरदारी म्हणुन सदर मंगल कार्यालायचे गेटवरती बालविवाह रोखण्या करिता लोकसभा निवडणुक २०१९ चा निकालाचा महत्वाचा बंदोबस्त चालु असताना देखील सदर ठिकाणी परिस्थीतीचे गांभीर्य ओळखुन साधे व गणवेशातील पोलीसांची नेमणुक करण्यात आली होती. त्यामुळे विश्रांतवाडीत होणारा बालविवाह रोखण्यात आला आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप-निरीक्षक चौगुले,सपोफौ जब्बार शेख पो.हवा दिनकर लोखंडे पो.ना विनायक रामाणे,पो.ना नितीन साबळे, पो.शि शिवाजी गोपणार,पो.ना विष्णु झांझुर्णे म.पो.ना कामीनी पवळे विश्रांतवाडी पोलीस स्टेशन यांनी केली आहे.